आमदार स्थानिक विकास कार्यक्रम
सन २०१८-१९ या आर्थिक वर्षासाठी लेखाशीर्ष ४५१५ ००१२ अंतर्गत मंजूर अर्थसंकल्पीय तरतुदीचे विधानमंडळ सदस्यनिहाय निधी वितरण.

महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग
शासन शुध्दीपत्रक क्रमांक-स्थाविका-०४१८/प्र.क्र. ५६ /का-१४८२,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक - २७ एप्रिल, २०१८.

वाचा:- शासन ज्ञापन क्र. स्थाविका-०४१८/प्र.क्र.५६/का. १४८२, दिनांक २५ एप्रिल, २०१८

शासन शुध्दीपत्रक :-

शासनाच्या, समक्रमांकाच्या दि. २५ एप्रिल, २०१७ च्या ज्ञापनातील परिच्छेद क्र. २ वगळण्यात येत असून त्याऐवजी पुढीलप्रमाणे परिच्छेद २ समाविष्ट करण्यात येत आहे.

" शासन निर्णय, नियोजन विभाग, क्र. स्थाविका-०६१६/प्र.क्र.९६/का.१४८२, दिनांक १२.७.२०१६ मधील परिच्छेद २.१ येथील तरतूदीनुसार राज्यातील २८७ विधानसभा सदस्यांना तसेच ७८ विधान परिषद सदस्यांपैकी सन २०१८-१९ या वर्षामध्ये २१ सदस्य निवृत्त होणार असून सदर सदस्य वगळता उर्वरित ५७ विधानपरिषद सदस्यांना देखील सन २०१८-१९ या पूर्ण आर्थिक वर्षाकरीता प्रति सदस्य रु. २.०० कोटी प्रमाणे निधी अनुज्ञेय आहे. त्यानुसार विधानसभेवर राज्यपालांद्वारे नामनियुक्त करावयाच्या एका सदस्याची जागा अद्याप रिक्त असल्याने उर्वरित २८७ विधानसभा सदस्य व ५७ विधानपरिषद सदस्य अशा एकूण ३४४ विधीमंडळ सदस्यांना प्रतिसदस्य ₹ २ कोटी याप्रमाणे ₹ ६८८.०० कोटी एवढा निधी मंजूर करण्यात येत आहे. "

सदर ज्ञापनाच्या परिच्छेद ४ ओळ क्र. २ मध्ये "एकूण ₹ ६९०.०० कोटी (रुपये सहाशे नव्वद कोटी फक्त)" याऐवजी "₹ ६८८ कोटी (रुपये सहाशे अठ्ठयाऐंशी कोटी फक्त)" असे वाचावे. तसेच ज्ञापनासोबतच्या विवरणपत्रातील सांगली जिल्हयासमोरील विधानसभा सदस्य क्र. १५९ - डॉ. श्री. पतंगराव कदम यांचे नाव वगळण्यात येत असून त्यांना मंजूर केलेला ₹ २.०० कोटी एवढा निधी अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर जिल्हाधिकारी, सांगली यांचेकडून परत घेण्यात येत आहे. यास्तव सांगली जिल्हयांस मंजूर केलेला एकूण निधी ₹ २२.०० कोटी ऐवजी ₹ २०.०० कोटी एवढा असेल. विवरणपत्रातील एकूण वि.स.स. २८८ समोर अ.क्र. ५ व ६ येथील रकान्यामध्ये "५७६००००" ऐवजी "एकूण वि.स.स. २८७ समोर अ.क्र. ५ व ६ येथे "५७४००००" असे वाचावे. विवरणपत्राच्या शेवटच्या एकूण वि.स.स. + वि.प.स. या रकान्याची बेरीज "६९०००००" ऐवजी "६८८००००" अशी वाचावी.

सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१८०४२७१६५४५२७२१६ असा आहे. हे शुध्दीपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Anil Dattatraya Joshi

Digitally signed by Anil Dattatraya Joshi
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Planning Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d7de9577f1b6301ba91e582c9402233953565e9fd17971ff1b7a2b8a94cf42c6, cn=Anil Dattatraya Joshi
Date: 2018.04.27 16:57:57 +05'30'

(अ.द. जोशी)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१ मा. मंत्री (नियोजन) यांचे खाजगी सचिव,
२ मा.राज्यमंत्री (नियोजन) यांचे खाजगी सचिव,
३ महालेखापाल (लेखापरीक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर,
४ महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर,
५ सर्व जिल्हाधिकारी,
६ सर्व उपायुक्त (नियोजन), विभागीय आयुक्तांचे कार्यालय,
७ सर्व जिल्हा नियोजन अधिकारी,
८ अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
९ सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
१० वित्त विभाग (कार्यासन अर्थ-१५/व्यय-८),
११ नियोजन विभाग, अर्थसंकल्प कक्ष (का.१४२४),
१२ ग्रंथपाल व संदर्भ अधिकारी, नियोजन विभाग,
१३ निवड नस्ती-का/१४८२, नियोजन विभाग,